आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- मुंबई, ठाण्यासह राज्यभरात पावसाचं थैमान/ गेल्या चोवीस तासांत सहा जणांचा मृत्यू, तर ३ जण बेपत्ता
- मुसळधार पावसाच्या शक्यतेमुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पुणे दौरा रद्द
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना अब्रुनुकसानी प्रकरणी १५ दिवसांची कोठडी

  **आणि**
- देशातल्या नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चात घट झाल्याची आरोग्य मंत्रालयाच्या अहवालात माहिती

**<><><><><><>**

मुंबईसह अनेक ठिकाणी काल मुसळधार पावसाने थैमान घातलं. मुंबईतले अनेक रस्ते जलमय झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. पाऊस आणि वादळामुळे विमानतळावरची १६ उड्डाणं वळवण्यात आली. तसंच, अनेक रेल्वेगाड्याही थांबवाव्या लागल्या. मुसळधार पावसामुळे मुंबईसह, ठाणे, पालघर जिल्ह्यातल्या सर्व शाळांना आज सुट्टी जाहीर झाली आहे.

**राज्यात गेल्या २४ तासांत ६ जणांचा** मृत्यू झाला असून २ जण जखमी तर ३ जण बेपत्ता आहेत. मुंबईत अंधेरीत पर्जन्य जलवाहिनीत कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला असून या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

**पालघर** आणि **नाशिक** या दोन जिल्ह्यांना आज पावसाचा रेड अलर्ट तर **मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, धुळे** आणि **नंदुरबार** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**पुणे शहर** आणि परिसरात काल दुपारनंतर अतिवृष्टिमुळं जनजीवन ठप्प झालं. खडकवासला धरण साखळीतून पाणी सोडण्यात येत असल्यानं सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात इतरही जिल्ह्यांमध्ये पाऊस सुरु असून, पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग केला जात असून, प्रशासनानं अनेक गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. **रत्नागिरी** जिल्ह्यात कालपासून जोरदार पाऊस सुरू आहे. जगबुडी नदी इशारा पातळीवरून वाहत आहे.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९९ टक्क्यावर पोहोचला असून धरणाच्या १८ दरवाजांमधून सध्या ३७ हजार ७२८ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

**लातूर** आणि **धाराशिव** जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या निम्न तेरणा, **हिंगोली** जिल्ह्यातल्या इसापूर तर **बीड** जिल्ह्यातल्या मांजरा धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सातारा जिल्ह्यातल्या **कण्हेर** आणि उरमोडी धरणातून आज सकाळपासून विसर्ग करण्यात येत आहे. **धुळे** जिल्ह्यातही अनेक धरणांमधून पाणी सोडण्यात येत आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांचा आजचा नियोजित पुणे दौरा रद्द झाला आहे. मुसळधार पावसाच्या शक्यतेमुळे हा दौरा रद्द झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. राज्यातल्या २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार होतं.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना शिवडी दंडाधिकारी न्यायालयानं आज १५ दिवसांची कोठडी आणि २५ हजारांचा दंड ठोठावला. मीरा भाईंदर शहरातल्या शौचालय कंत्राटावर केलेल्या विधानामुळे मेधा सोमय्या यांनी त्यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता. मीरा भाईंदर पालिका क्षेत्रातली १५४ सार्वजनिक शौचालयं बांधण्याचं कंत्राट मेधा सोमय्या यांच्या संस्थेला मिळालं होतं. मात्र, या कंत्राटात घोटाळा झाल्याचा आरोप संजय राऊत यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला होता.

<><><><><>

संघटन शक्ती मजबूत करण्याची आणि डबल इंजिन सरकारची कामगिरी सामान्य माणसांपर्यंत पोहचवण्याची सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकत्याच केलेल्या महाराष्ट्र दौऱ्यात दिली आहे. या मूलमंत्राचे पालन करुन राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी प्रयत्न करू, असं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आज म्हणाले. मुंबईत ते वार्ताहरांना संबोधित करत होते. या दौऱ्यात अमित शहा यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळं संघटनेत ऊर्जा निर्माण झाली आहे. महायुतीच्या विजयासाठी पक्ष संघटना आता जोमानं काम करेल, असंही त्यांनी सांगितलं. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन सामान्य जनतेच्या मनात महाविकास आघाडीने खोट्या प्रचारामुळे निर्माण केलेला संभ्रम दूर करतील, त्याचबरोबर केंद्र, राज्य सरकारच्या कामगिरीची माहिती देतील, असंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

चंद्रपूरमध्ये ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानांतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर ते दिनांक २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान 'स्वच्छता ही

सेवा' पंधरवड्याचं आयोजन केलं आहे. यंदा त्यात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" ही संकल्पना राबवली जात आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या वार्ताहराकडून....

**होल्ड - मंगेश बेले**

**<><><><><>**

नाशिकमध्येही स्वच्छता ही सेवा पंधरवड्याचं आयोजन करण्यात आलं आहे. याबाबत नाशिक महापालिकेचे घन कचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. आवेश पलोड यांनी सांगितलं

**होल्ड बाईट - पलोड**

**<><><><><>**

भारतामध्ये सर्वसामान्य नागरिकांना एकंदर आरोग्य सुविधांसाठी आपल्या खिशातून कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये मोठी घट झाली आहे. २०१३-१४ मध्ये हे प्रमाण ६४ पूर्णांक दोन शतांश टक्के होतं, ते २०२१ मध्ये ३९ पूर्णांक चार दशांश टक्क्यांवर आलं आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षांसाठीचा राष्ट्रीय आरोग्य योजनांबाबतचा अहवाल काल प्रकाशित केला. त्यातून ही बाब समोर आली आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातही सरकारनं आरोग्य क्षेत्रावर केलेल्या खर्चाचं प्रमाण १ पूर्णांक १३ शतांश टक्क्यांवरून वाढून १ पूर्णांक ८४ शतांश टक्क्यांवर पोचल्याचं या अहवालातून स्पष्ट झालं आहे.

**<><><><><>**

देशातली ५० हून अधिक औषध दर्जेदार नसल्याचा अहवाल CDSCO अर्थात केंद्रीय औषध नियामक संस्थेनं दिला आहे.  त्यात पॅरासीटमॉल, व्हिटॅमिन

बी, कॅल्शियम आणि विटामिन डी ३ प्रकारातल्या औषधांचा समावेश आहे. यामुळं या औषधांच्या सुरक्षेविषयी काळजी निर्माण झाली आहे. विविध कंपन्यांनी ही औषधं तयार केली आहेत.

**<><><><><>**

बडतर्फ प्रशिक्षणार्थी आयएसएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या हंगामी जामीन अर्जावरची सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. अटकपूर्व अंतरिम संरक्षण वाढवण्याचा निर्णय उच्च न्यायालयानं दिला आहे. खेडकरांच्या वकिलांनी तपशीलवार म्हणणं मांडण्यासाठी वेळ मागितला आहे.  आता या प्रकरणाची सुनावणी ४ ऑक्टोबर रोजी होणार असून, तोपर्यंत पूजा खेडकरला दिलेला दिलासा कायम असेल. खेडकर यांच्यावर चुकीच्या पद्धतीने ओबीसी आणि दिव्यांग कोट्यातून सवलत घेतल्याचा आरोप आहे. सध्या त्या हंगामी जामिनावर आहेत. पूजा खेडकर यांच्या जामीन अर्जाला युपीएससीने विरोध केला आहे.

**<><><><><>**

नागपूर इथल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ . सुभाष चौधरी यांचं एका खासगी रुग्णालयात आज निधन झालं. डॉ. चौधरी यांना यकृताशी संबंधित आजार होता.

डॉक्टर चौधरी यांच्या निधनाबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दुःख व्यक्त केलं.  राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ सुभाष चौधरी यांच्या निधनाचं वृत्त दु:खद आहे, शैक्षणिक क्षेत्रात डॉ चौधरी यांचं भरीव योगदान राहिलं आहे, मृदुभाषी आणि विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे कुलगुरू म्हणून ते कायम स्मरणात राहतील, अशा शब्दांत गडकरी यांनी समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यात कुटंगा गावात शेतामध्ये काम करत असलेल्या आदिवासी महिलेचा आणि तिच्या अडीच वर्षाच्या बाळाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस पुढचा तपास करत आहे. महावितरणच्या लाईनची अवस्था खराब असून जागोजागी डीपी किंवा कृषी कनेक्शन उघडे पडले असल्याने महावितरण विभागाने याकडे जातीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या चारोटी इथं मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर आज सकाळी तेलाचा टँकर उलटून अपघात झाला. अपघात झाल्यानंतर टँकरमधून तेलगळती झाली आणि त्यामुळे महामार्गावरची वाहतूक ठप्प झाली होती. मात्र, संबंधित तेल हे ज्वलनशील नसल्याचं निष्पन्न झाल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत सुरू झाली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

**<><><><><>**

हवामान विभागानं उद्या सकाळी साडे ८ वाजेपर्यंत पालघर आणि नाशिकमध्ये रेड अलर्ट दिला आहे. या दोन्ही जिल्ह्यात वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र आणि ठाणे, रायगड तसंच पुण्यात ऑरेंज अलर्ट आहे. राज्याच्या इतर भागातही आज जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.